वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ९३५४ /२०२३ दिनांक :- २९ /१२/२०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- दिनांक- ०१/०१/२०२४ रोजी **नुतन वर्षानिमित्त दगडूशेठ गणपती मंदिर परिसरात करण्यात येणाऱ्या वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

पुणे शहरात नूतन वर्षारंभाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी शहरातील नागरीक मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या रस्त्यांवर गर्दी करीत असतात. तसेच नूतन वर्षानिमित्ताने नागरीक हे दगडूशेठ गणपती मंदिर येथे देवदर्शनाकरीता मोठ्या प्रमाणात गर्दी करत असतात. त्यामुळे सदर भागातील रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात रहदारी वाढते.

सदर कालावधीत दगडूशेठ मंदिर व परिसरात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन पुणे शिवाजी रोडवर दिनांक- ०१/०१/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा. पासून गर्दी संपेपर्यंत खालील नमुद रोडवरील वाहतूकीत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

**दिनांक ०१/०१/२०२४ रोजी ०५.०० वा. पासून गर्दी संपेपर्यंत खालील नमुद रोडवर सर्व प्रकारच्या वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून) बंदी करण्यात येत आहे. तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करुन इच्छितस्थळी जावे.**

- **बंद मार्ग :-** शिवाजी रोडने स्वारगेटकडे जाण्यासाठी मार्ग बंद करण्यात येत आहे.
  **पर्यायी मार्ग :-** वाहन चालकांनी स.गो. बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक – टिळक चौक – टिळक रोडने इच्छितस्थळी जावे.
- **बंद मार्ग :-** स.गो. बर्वे चौकातून पुणे मनपा भवनकडे जाण्यासाठी मार्ग बंद करण्यात येत आहे.
  **पर्यायी मार्ग :-** वाहन चालकांनी स.गो. बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने – झाशी राणी चौक डावीकडे वळुन इच्छितस्थळी जावे.
- **बंद मार्ग :-** अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे जाण्यासाठी मार्ग बंद करण्यात येत आहे.
  **पर्यायी मार्ग :-** वाहन चालकांनी बाजीराव रोडने सरळ इच्छितस्थळी जावे.
- **बंद मार्ग :-** शिवाजी रोडने जिजामाता चौकातून गणेश रोडने दारूवाला पुलाकडे जाण्यासाठी बंद करण्यात येत आहे.
  **पर्यायी मार्ग :-** वाहन चालकांनी गाडगीळ पुतळा येथुन डाव्या बाजूने कुंभारवेस चौक – पवळे चौक – जुनी सातटोटी पोलीस चौकी मार्गे इच्छितस्थळी जावे.
- **बंद मार्ग :-** गणेश रोडने देवजीबाबा, जिजामाता चौकाकडे जाण्यासाठी बंद करण्यात येत आहे.
  **पर्यायी मार्ग :-** वाहन चालकांनी अपोलो टॉकिज, नरपतगीरी चौक, दारूवाला पुल – दुधभट्टी मार्गे इच्छितस्थळी जावे.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- सर्व संबंधितांना